# -: प्रेस नोट :-

## नगर पंचायत अहेरी येथील नगरसेवकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांची कारवाई.

| | | |
|---|---|---|
| १ | घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली |
| २ | तक्रारदार | पुरुष, वय ३३ वर्ष,व्यवसाय- ईलेक्ट्रीकल ठेकेदार. |
| ३ | आरोपी | श्री. अमोल विलासराव गुडेलिवार वय ४० वर्ष पद- स्विकृत नगरसेवक, नगरपंचायत अहेरी, ता. अहेरी. जि. गडचिरोली मुळ पत्ता- प्रभाग क्र. ९ राजे विश्वेश्वरराव महाराज चौक, बसस्टॉप रोड अहेरी, ता. अहेरी जि. गडचिरोली. |
| ४ | तक्रार | दिनांक १५/१०/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे आरोपी श्री अमोल विलासराव गुडेलिवार, नगरसेवक, नगरपंचायत अहेरी जि. गडचिरोली हे तक्रारदार यांना मौजा ता. अहेरी येथील प्रवर्गामध्ये अतिरिक्त सर्व्हिस केबल टाकण्याच्या मिळालेल्या कामाचा मोबदला म्हणुन २,७०,०००/- रु मागत असल्याने त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्याबबतचा तक्रार अर्ज दिला होता. |
| ५ | तक्रारची पडताळणी | दिनांक १५/१०/२०२६ रोजी तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांना पंच व व्हाईस रेकॉर्डर सह लाच मागणी पडताळणी कामी यातील आरोपी यांचे हार्डवेअरच्या दुकानावर पाठविले असता आरोपी यांनी यातील तक्रारदार यांना तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे २,७०,०००/- रूपये लाचेची मागणी केली व आता जमतील तितके पैसे थोडया वेळात आणुन देण्यास सांगितले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्याकडे सध्या १,२०,०००/- रु उपलब्ध असल्याचे सांगितले असता आरोपी यांनी १,२०,०००/- रु थोडया वेळात हार्डवेअरच्या दुकानावर आणुन देण्यास सांगितले. |
| ६ | सापळा कार्यवाही/ थोडक्यात हकिकत | तक्रारदार हे विद्युत ठेकेदार असून त्यांची ठेकेदारी फर्म व अहेरी, जि. गडचिरोली येथे विद्युत साहित्याचे दुकान आहे. तक्रारदार यांच्या मित्राच्या ठेकेदारी फर्मला नगरोत्थान योजना सन २०२५-२६ अंतर्गत मौजा अहेरी येथील प्रभाग क्र. १ ते १० मध्ये ९,९३,९०९/- व प्रभाग क्र. ११ ते १७ मध्ये ९,९३,८५६/- असे एकूण १९,८७,७६५/- किमतीचे अतिरिक्त सर्व्हिस केबल टाकण्याचे काम मंजूर झाले होते. तक्रारदार यांनी मित्राच्या फर्मसोबत करार करून प्रभाग क्र. ११ ते १७ मधील काम पूर्ण केले, तसेच मित्राच्या विनंतीवरून प्रभाग क्र. १ ते १० मधील कामावरही देखरेख ठेवली. दोन्ही कामे विहित १८० दिवसांच्या मुदतीत पूर्ण झाली असून त्यांची संपूर्ण बिले अदा झाली होती. त्यानंतर नगरपंचायत अहेरी येथील नगरसेवक आरोपी श्री. अमोल विलासराव गुडेलीवार यांनी सदर कामे जिल्हा नियोजन समिती, गडचिरोली येथून स्वत: मंजूर करून आणल्याचे सांगून बिलाच्या रकमेच्या १५ टक्के मोबदला म्हणून ३,००,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी दिनांक ०५/०८/२०२६ रोजी आरोपीस ३०,०००/- रोख दिले होते. त्यानंतर आरोपी उर्वरित २,७०,०००/- लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे तक्रार दिली.<br>पंच व व्हॉईस रेकॉर्डरसह तक्रारदार यांना आरोपी श्री. अमोल विलासराव गुडेलीवार यांच्या श्रीराम ट्रेडर्स, मुख्य चौक, बस स्टॅण्ड रोड, अहेरी येथील हार्डवेअर दुकानात लाच मागणी पडताळणीसाठी पाठविण्यात आले. त्यावेळी आरोपी यांनी तक्रारदार यांच्याकडे उर्वरित २,७०,०००/- लाचेची मागणी करून, त्यापैकी सध्या उपलब्ध असलेली १,२०,०००/- रक्कम थोड्या वेळात आणून देण्यास सांगितले.<br>तक्रारदार यांना पंच व व्हॉईस रेकॉर्डरसह लाचेची १,२०,०००/- रक्कम घेऊन आरोपीच्या श्रीराम ट्रेडर्स, अहेरी येथील दुकानात पाठविण्यात आले. त्यावेळी आरोपी श्री. अमोल विलासराव गुडेलीवार यांनी तक्रारदार यांच्याकडून १,२०,०००/- लाचेची रक्कम स्वीकारली. लाचेची रक्कम स्वीकारताच आरोपी यांना पथकाने ताब्यात घेतले.<br>यातील मुळ यातील आरोपीचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) कलम ७ अन्वये अपराध होत असल्याचे सापळा अधिकारी श्री. अरविंद राउत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांनी सरतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | विरुध्द पोलीस स्टेशन अहेरी अप.क्र.३६८/२०२६ अन्वये १५/१०/२०२६ रोजी २३:३० वा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| ७ | गुन्हा रजिस्टर नं/कलम/पोलीस स्टेशन/जिल्हा. दिनांक व वेळ | पोस्टे अहेरी जि. गडचिरोली अप क्र. ३६८/२०२६ दि १५/१०/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन-२०१८) |
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | १५/१०/२०२६ रोजी २३.४८ वाजता |
| ९ | सापळा अधिकारी | श्री. अरविंद राउत, पोलीस निरीक्षक, लाप्रवि गोंदिया. |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | श्री. निलेश लोधी, पोलीस उपअधीक्षक लाप्रवि गोंदिया. |
| ११ | तपासी अधिकारी | श्री. किरण बगाटे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि गडचिरोली. |
| १२ | सापळा पथक | पोलीस उपअधीक्षक श्री. लिनेश लोधी,<br>पोलीस निरीक्षक श्री. अरविंद राउत,<br>सफौ/चंद्रकांत करपे, पोहवा/संजयकुमार बोहरे, पोहवा/मंगेश कहालकर, पोना/संतोष शेंडे, पोना/संतोष बोपचे, पोना/दिपक बाटबर्वे सर्व लाप्रवि गोंदिया. |
| १३ | मार्गदर्शन | १) श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपुर.<br>२) श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागुपर.<br>३) श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपुर. |

१४. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावे असे आवाहन पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रात सगणे यांनी केले आहे.

| | घटक कार्यालय | परीक्षेत्र कार्यालय | लाप्रवि मुख्यालय |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| पत्ता | पोलीस उपअधिक्षक,<br>ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,<br>गडचिरोली. | पोलीस अधिक्षक,<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपुर, २ रा माळा प्रशासकिय ईमारत क्र १ सिव्हील लाईन्स, नागपुर. | सर पोचखानवाला मार्ग,<br>वरळी मुंबई-४०००३० |
| दुरध्वनी क्रमांक<br><br>व्हॉट्सअप क्रमांक<br>१०६४<br>टोल फ्री क्रमांक | ०७१३२-२९५०२०<br><br>७५८८०४१०६४<br><br>१०६४ | ०७१२२-५६१५२०<br><br>९०६७६७१०६४ | ०२२-२४९२१२१२ |
| ई-मेल आयडी | acbgadchiroli123@gmail.com | spacbnagpur@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

(विक्रांत सगणे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner